सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**संदर्भ : रासेयो/२०२४–२५/३४८** **दि. २३/११/२०२४**

**प्रति,**

**मा. प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

**विषय : विशेष शिबिर Online प्रस्ताव भरणेबाबत...**
**संदर्भ : रासेयो–२०२४/प्र.क्र.७४/रासेयो कक्ष, दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२४**

महोदय/महोदया,

दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रत्येक रासेयो महाविद्याल दत्तक गाव योजना राबवते आणि ह्याअंतर्गत या गावात ७ दिवसीय विशेष शिबिर घेतले जाते. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ वर्षाकरिता मा. राज्यसंपर्क अधिकारी कार्यालय यांनी पाठवलेल्या पत्रानुसार **'Youth for My Bharat'** व **'Youth for Digital Literacy' या विषयावर आधारीत** विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. महाविद्यालयांनी **My Bharat** पोर्टलवर रजीस्ट्रेशन करून **My Bharat** पोर्टलवर **Activity Event** तयार करून **Upload** करावेत. बॅनर, टीशर्ट, कार्यक्रम पत्रिकेवर सदर थीमचा उल्लेख करावा. विशेषतः महाविद्यालय आयोजित विशेष शिबिरांस, राष्ट्र/राज्य व विद्यापीठस्तरावरील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा/विभाग समन्वयक अनपेक्षितपणे भेट देणार आहेत. सबब ग्रामीण शिबिरांचे नियोजन सकारात्मक व परिणामकारक करावे.

त्या अनुषंगाने महाविद्यालयाने विशेष शिबिरादरम्यान वरीलप्रमाणे उपक्रमांसह गावस्तरावर शोष खड्डे/पाझर खड्डे तयार करणे, बालविवाह रोखण्यासाठी समाजप्रबोधन करणे, शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला–मुलींची अनेमिया (रक्तक्षय) बाबत तपासणी करणे इत्यादी विशेष कार्यक्रम तसेच विद्यापीठाने ठरवून दिलेले उपक्रम आयोजित करावयाचे आहेत.

यावर्षी प्रत्येक रासेयो एककाने हे ७ दिवशीय विशेष शिबिर **३१ जानेवारी २०२५** पुर्वी आयोजित करणे आवश्यक आहे. विशेष शिबिरासाठीचे प्रत्येक रासेयो एकककाकडून प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. हे प्रस्ताव **Online** पद्धतीने मागवण्यात येत असून **दि. १० डिसेंबर, २०२४** पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना एककांनी Online प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. ह्यासाठी www.unipune.ac.in/bcud/login/nss/special camp proposal लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. **दि. १० डिसेंबर २०२४** नंतर शिबिर प्रस्ताव Online लिंक उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तरी निर्धारीत कालावधीमध्ये विशेष शिबिराचे संपूर्ण नियोजन करून प्रस्ताव भरण्यात यावे.

दत्तक गावाची निवड करताना शिबिरार्थी एकत्र किंवा टप्प्याटप्प्यात काम करतील आणि निवासस्थानी राहतील अशी व्यवस्था गावातील पदाधिकाऱ्यांशी बोलून त्याची शहानिशा करावी. केवळ राहण्या–खाण्याची सोय हाच एखाद्या गावाच्या निवडीचा निकष अजिबात असू नये असेही पुन्हा अधोरेखित करण्यात येत आहे. त्याऐवजी पुढील तीन ते पाच वर्षांमध्ये त्या गावात विविधांगी विकास व संरचनात्मक काम करणे शक्य व्हावे आणि अशा उपलब्धी व नैसर्गिक गरजा ज्या गावामध्ये निदर्शनास येतील त्याच गावाची संयोजक महाविद्यालयांनी निवड करावी. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५


**क्रमांक: रासेयो-२०२४/प्र.क्र.७४/रासेयो कक्ष** **दिनांक: २८ऑक्टोंबर, २०२४**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित, सर्व विद्यापीठे / संचालनालये

**विषय : सन २०२४-२५ मधील विशेष शिबिरांच्या आयोजनाबाबत.**

संदर्भ: १) शासन निर्णय क्रमांक रासेयो-२०२३/प्र.क्र.१००/साशि-७ दि. १७.०५.२०२३

२) शासन निर्णय क्रमांक रासेयो-२०२३/प्र.क्र. १०९/साशि-७ दि.१७.०५.२०२३

३) वार्षिक कृती आराखडा अमलबजावणी बाबतचे या कार्यालयकडील पत्र क्रमांक - रासेयो-२०२४/प्र क्र ३५/ रासेयो कक्ष दि. ७ ऑक्टोबर २०२४

केंद्र शासनाकडून सन २०२४-२५ साठी रासेयो विद्यार्थी संख्येत वाढ करण्यात आलेली नसल्यामूळे सन २०२३-२४ च्या रासेयो विद्यार्थी संख्येनूसार उपरोक्त संदर्भ १ व २ च्या शासन निर्णयान्वये विशेष शिबिरांसाठी अनुक्रमे शासन अनुदानित व स्वयंनिर्वाहित रासेयो विद्यार्थी संख्या विद्यापीठ/संचालनालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंजूर व वितरित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित विद्यापीठ/संचालनालय अंतर्गत प्रत्येक घटक महाविद्यालयातर्फे वर्षातून एकदा सात दिवसांचे निवासी विशेष शिबीर महाविद्यालयीन दत्तक घेतलेल्या गावी नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळा ऋतू मध्ये आयोजित करण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना २ वर्षामध्ये प्रतिवर्षी १२० तास म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही वर्षात मिळून एकदा सात दिवसीय निवासी विशेष शिबिर करणे अनिवार्य आहे.

दरवर्षीप्रमाणे सन २०२४-२०२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांचे आयोजन दि. ०१.११.२०२४ ते ३१.०१.२०२५ या कालावधीत करण्यात यावे. सन २०२४-२५ मध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करत असताना यावर्षासाठी रासेयो कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेली थीम "Youth for My Bharat" व "Youth for Digital Literacy" ची अमंलबजावणी करावी. ज्या महाविद्यालयाचे भारत Registration झाले आहे, त्यांनी My Bharat Portal वर activities Event तयार करुन Upload करावेत. तसेच विहित मुदतीत विशेष शिबिरे आयोजित करण्यास्तव रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी सर्व कार्यक्रम अधिकारी यांना सूचित करावे. या विशेष शिबिरांमध्ये संदर्भ क्रमांक ३ नुसार गाव स्तरावर शोष खड्डे/ पाझर खड्डे तयार करणे, बाल विवाह रोखण्यासाठी समाजप्रबोधन करणे, शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला- मुलींची अनेमिया (रक्तक्षय) बाबत तपासणी करणे इत्यादि विशेष कृती कार्यक्रम राबवण्यात यावेत. तसेच पाणी संवर्धनासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे राबवण्यात येत असलेल्या YEWS या कार्यक्रमांतर्गत WHY WASTE YEWS मोबाइल App वरती शिबिरार्थिची नोंदणी करून घेण्यात यावी. विशेष सात दिवशीय शिबिर संपन्न झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल पुढील नमुन्यात रासेयो क्षेत्रिय संचालनालय कार्यालयास तसेच या कार्यालयास पाठवावा.

**(डॉ. निलेश पाठक)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१.रासेयो क्षेत्रिय संचालक,रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे